# <u>वाई येथील मे. जिल्हा न्यायाधीश-१ यांचे न्यायालयात, वाई येथे</u>

MHST190054072023

**नि.दि.अपिल क्र.४७९/२०२३**
नामदेव शिंदे -वि.- रमेश शिंदे वगैरे

**<u>निशाणी क्र.६५ खाली आदेश</u>**
**(पारित दिनांकः १९.०८.२०२५)**

१) प्रस्तुतचा अर्ज हा अपिलार्थी यांनी आवश्यक पक्षकार म्हणुन सामील करून घेणेसाठी सादर केलेला आहे. अपिलार्थी यांचे कथनानुसार दावा मिळकतींचे सरसनिरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी रे.दि.मु.नं.१७२/२०१० दाखल केला होता.

२) सदर दाव्याचे कामी अपेलंट यांचे बहिणींनी रजिस्टर हक्कसोडपत्र करून दिले असल्यामुळे त्यांना दाव्याचे कामी सामील केले नव्हते. परंतु दिवाणी न्यायाधीश, क.स्तर यांनी Non–Joinder of Necessary Parties या तांत्रीक मुद्यावरून वादीचा मुळ दावा फेटाळुन लावला. सदर अपिलामध्येही सदर मुद्याची बाधा येते की काय अशी भिती अपेलंट यांना वाटू लागली आहे. अपेलंट यांची एक बहिण शालिनी आस्मे यांनी **नि.५९** अन्वये प्रकरणात सामील करून घेणेसाठी अर्ज सादर केलेला आहे. सबब अपेलंट यांनी त्यांच्या आणखी दोन बहिणी नामे अनुसया बाळा शिंगटे, शोभा सुर्वे व एक चुलत बहिण निलीमा धुमाळ हे आवश्यक पक्षकार असल्यामुळे त्यांना अपिलाचे मध्ये रिस्पॉडंट म्हणुन सामील करणेसाठी विनंती केली आहे. अनुसया शिंगटे ही दि.०६/०७/२०१२ रोजी मयत झालेली आहे. त्याबाबत अपिलार्थी यांनी नि.७२ लगत मृत्यु दाखला दाखल केलेला आहे. तिचे वारसाचे नाव अर्ज नि.क्र.६५ मध्ये नमूद

केले व त्यांना आवश्यक पक्षकार म्हणून अभिलेखावर घेण्यात यावे, अशी विनंती केली. इतर बहिणी सौ. शोभा सुर्वे वच सौ. निकिता धुमाळ हयांना पक्षकार बनविणेस विनंती केली.

३) सदरच्या प्रकरणामध्ये गैरअपिलार्थी क्र.१ ते ८ यांनी ''सामील करणेस रिस्पॉडंट यांची हरकत नाही'' अशा प्रकारचे म्हणणे सादर केलेले आहे.

४) अपेलंटचे वकील श्री.डी.जे. जगदाळे हजर. रिस्पॉडंट नं.९ ते १२ यांचे वकील हे दुपारी ५.०० पर्यंत पुकारले असता गैरहजर. कोणत्याही प्रकारचा अर्ज दिलेला नाही.

५) हजर असलेल्या वकीलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. रिस्पॉडंट नं.९ ते १२ चे म्हणणे विचारात घेण्यात आले. ह्याबाबत वाद नाही की, दिवाणी न्यायाधीश, क.स्तर यांचे समोर वाटणी व ताबा मिळण्याचा दावा दाखल केलेला होता. ह्याबाबत वाद नाही की, अनुसया बाळा शिंगटे, शोभा सुर्वे व निलीमा धुमाळ अपेलंट क्र.१ व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या बहिणी आहेत. वादीचे असे म्हणणे होते की, वादातील मिळकत ही वडिलोपार्जित होती. अशा परिस्थितीमध्ये सदर बहिणी ह्या वादमिळकतीमध्ये तथाकथीत सहभागीदार असल्याचे दिसुन येते. त्यामुळे ते प्रकरण गुणवत्तेवर काढणेसाठी हया बहिणी आवश्यक पक्षकार ठरते. केवळ उशिरा सदरचा अर्ज सादर केला, हे कारण अर्ज नामंजुर करणेसाठी योग्य असु शकत नाही. अभिलेखावर असे कोणतेही कारण उपलब्ध नाही, जेणेकरुन अर्ज क्र.६५ नामंजुर केला जाऊ शकतो. करिता निशाणी क्र.६५ चा अर्ज, प्रकरण गुणवत्तेवर निकाली करणेसाठी मंजुर करणे आवश्यक आहे, जेणेकरून त्यांना स्वतःची बाजु मांडता येईल. करिता, खालील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

## आदेश

अर्ज निशाणी क्र.६५ मंजुर करणेत येत आहे व शोभा सुर्वे, अनुसया बाळा शिंगटे मयत तर्फे वारस संभाजी, सुनिल, भास्कर, कांचन, सुनंदा, सुरेखा, व निलीमा धुमाळ यांना अपिलामध्ये सामील करून त्यांना आपले म्हणणे सादर करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

RAJENDRA NARAYANRAO MEHARE

Digitally signed by RAJENDRA NARAYANRAO MEHARE
Date: 2025.08.20 17:59:33 +0530

वाई. (आर.एन.मेहरे)

दि.१९/०८/२०२५ जिल्हा न्यायाधीश–१, वाई